# प्रेस नोट / जाहीर सुचना

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : एस-१०/ २०१५/ अनौ.३०/प्र.क्र.४६२/फ-३, दि.१६/१०/२०१८ अन्वये मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पालघर जिल्हयामध्ये कांदळवनाचे संरक्षण व संवर्णनासाठी जिल्हास्तरीय समिती, तसेच तालुका स्तरीय समिती गठीत केलेली आहे. जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष डॉ. प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी पालघर हे असून सदस्य सचिव सहा. वनसरंक्षक पालघर हे आहेत. त्याचप्रमाणे पालघर,डहाणू व वसई येथील उपविभागीय अधिकारी हे तालुकास्तरीय समितीचे अध्यक्ष असून संबंधीत मुख्यालयाचे वन परिक्षेत्र अधिकारी हे सदस्य सचिव आहेत. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे.

१) कांदळवन संरक्षण व संवर्धनाच्या अनुषंगाने जिल्हा / तालुक्यातील सर्व शासकीय यंत्रणा / संस्था/ अधिकारी यांच्या अधिकारी व जबाबदा-यांचा तत्पर व परिणामकारक वापर करून घेणे व सर्व शासकीय यंत्रणांमध्ये योग्य समन्वय ठेवणे..

२) कांदळवन संरक्षण व संवर्धन तसेच तालुक्यातील बाधीत क्षेत्रावर तज्ञाच्या सल्ल्याने कांदळवनांची पुन:स्थापना (Restoration) करणे.

३) कांदळवन संदर्भात तक्रारी व तक्रारीचे निराकरण करण्यासाठी तालुकास्तरावर मध्यवर्ती नियंत्रण कक्षासह एक स्वतंत्र कक्ष स्थापन करणे.

४) कांदळवन क्षेत्रात भारतीय वन अधिनियम, १९२७, वन संवर्धन अधिनियम, १९८० व पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ चा भंग होणार नाही, याची दक्षता घेणे; झाल्यास संबंधिता विरुध्द नियमानुसार वेळेत कार्यवाही करणे.

५) समितीच्या मासिक बैठकीत मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांच्या अंमलबजावणी बाबतच्या कामाचा तालुकास्तरावर आढावा घेणे. तसेच सदर बैठकीचे इतिवृत्त जिल्हाधिकारी पालघर यांच्या संकेतस्थळावर किंवा समर्पित संकेतस्थळावर (dedicated website) प्रसिध्द करणे.(http://palghar.gov.in)

६) संबंधित तालुक्यातील संवेदनशिल कांदळवन क्षेत्र निश्चित करणे व सदर क्षेत्रावर पोलीस यंत्रणा/ वनरक्षक/महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा रक्षक यांच्यामार्फत निगरानी (surveillance) करणे.

७) संबंधित तालुक्यातील संवेदनशिल कांदळवन क्षेत्रात वाहनांना प्रवेशबंदी करण्यासाठी अडथळे निर्माण करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे.

८) संबंधित तालुक्यातील संवेदनशिल कांदळवन क्षेत्रास बाधा पोहचविण्या-या उपद्रवींवर निगरानी ठेवण्यासाठी आवश्यकतेनुसार सीसीटीव्ही बसविण्याबाबत निर्णय घेणे.

९) संबंधीत समितीने केलेल्या कार्यवाहीबाबतचा प्रथम अनुपालन अहवाल मा.उच्च न्यायालयास दिनांक ०१ डिसेंबर २०१८ पूर्वी सादर करणे आवश्यक असल्याने तत्पूर्वी कार्यवाही करून वेळेत अहवाल सादर करणे.

१०) संबंधीत समित्या गठीत झाल्यानंतर समिती अध्यक्ष/सदस्य सचिव यांनी सदर समित्यांची पुरेशी प्रसिध्दी करावी.

११)संबंधीत समितीकडे नागरीकांना आपल्या लेखी तक्रारी नोंदविता येतील याबाबत व त्यासाठी उपलब्ध विविध मार्ग नागरिकांना प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळवावे. (जसे कार्यालय फोन नंबर, email address, what`s app. इ.)

१२) जिल्हयातील/तालुक्यातील कांदळवन क्षेत्रातील अतिक्रमण, कांदळवनाची तोड, अनधिकृत बांधकामे व इतर सर्व तक्रारींच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तातडीने कार्यवाही करावी.

१३)प्राप्त होणा-या तक्रारींवर तालुकास्तरीय समितीने तातडीने कार्यवाही करून कांदळवनावर अतिक्रमण/नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी, त्यासाठी आवश्यकता असल्यास स्थानिक पोलीस प्रशासनाची मदत घेण्यात यावी.

पालघर जिल्हयातील कांदळवन तक्रारीबाबत पुढील दुरध्वनी क्रमांक व ई मेलद्वारे तक्रारी नोंदविता येतील.

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | दुरध्वनी क्रमांक | ई मेल |
|---|---|---|---|
| | जिल्हाधिकारी कार्यालय नियंत्रण कक्ष | | |
| १ | जिल्हाधिकारी कार्यालय पालघर (नियंत्रण कक्ष) | ०२५२५ - २९७४७४ | collectorpalghar@gmail.com |
| | वसई तालुका नियंत्रण कक्ष | | |
| १ | उपविभागीय अधिकारी वसई (नोडल अधिकारी) | ०२५० - २३२०८८० | vasaisdo@gmail.com |
| २ | उप वनसंरक्षक ठाणे, (नोडल अधिकारी)<br>उप वनसंरक्षक डहाणू (नोडल अधिकारी)<br>विभागीय वन आधिकारी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली, (नोडल अधिकारी) | ०२२ - २५४२१३७३<br>०२५२८-२२२३३७<br>०२२-२८८६०३६२ | dycfthane@mahforest.gov.in<br>dycfdahanu@mahaforest.gov.in<br>sgnpmumbai@gmail.com |
| ३ | उप विभागीय पोलीस अधिकारी वसई, (नोडल अधिकारी) | ०२५०-२३३२६१४ | vasaisdpo@gmail.com |
| ४ | तहसिलदार वसई | ०२५० - २३२२००७ | tahvasai@gmail.com |
| ५ | उप आयुक्त, वसई विरार महानगर पालिका | ०२५० -२५२५१०५ | vasaivirarcorporation@gmail.com |
| | पालघर तालुका नियंत्रण कक्ष | | |
| १ | उपविभागीय अधिकारी पालघर, (नोडल अधिकारी) | ०२५२५ - २९७२७२ | palgharsdo@gmail.com |
| २ | उप विभागीय पोलीस अधिकारी पालघर, (नोडल अधिकारी) | ०२५२५ - २५१९०३ | palgharsdpo@gmail.com |
| ३ | तहसिलदार पालघर, | ०२५२५ - २५४९३० | tahpalghar@gmail.com |
| ४ | उप वनसंरक्षक डहाणू, (नोडल अधिकारी) | ०२५२८-२२२३३७ | dycfdahanu@mahaforest.gov.in |
| | डहाणू-तलासरी तालुका नियंत्रण कक्ष | | |
| १ | सहा. जिल्हाधिकारी डहाणू, (नोडल अधिकारी) | ०२५२८ - २२२२३१ | sdodahanu@gmail.com |
| २ | उप विभागीय पोलीस अधिकारी डहाणू, (नोडल अधिकारी) | ०२५२८-२२२४३३ | dahanusdpo@gmail.com |
| ३ | तहसिलदार डहाणू | ०२५२८ - २२११८२ | tahdahanu@gmail.com |
| ४ | तहसिलदार तलासरी | ०२५२१ - २२००१८ | tahtalasari@gmail.com |
| ५ | उप वनसंरक्षक डहाणू, (नोडल अधिकारी) | ०२५२८-२२२३३७ | dycfdahanu@mahaforest.gov.in |

तसेच पालघर जिल्हयाअतंर्गत कांदळवन संवर्धन व संरक्षणासाठी तक्रारी ९१५८७६०७५६ या क्रमांकावर what`s app व्दारे पाठविता येतील. तरी जिल्हयातील कांदळवन संवर्धन व संरक्षणसाठी याबाबत उपरोक्त माध्यमाव्दारे तक्रारी नोंदविण्याचे आवाहन डॉ.प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी पालघर यांनी केले आहे.

ठिकाण :- पालघर

दिनांक :- ०३/११/२०१७

सही XXX

जिल्हाधिकारी पालघर

सुचना फलकावर प्रसिध्दीसाठी